शिक्षण विभाग(प्रा.) जिल्हा परिषद नांदेड
रेल्वे स्टेशन रोड कोर्ट समोर वजिराबाद नांदेड
www.zpnanded.in EMAIL:-ssananded1@gmail.com.

जा.क्र.जिपना/शिअप्रा.प्रा-5क/ 2232 /2026 दि. 07 APR 2026

परिशिष्ट (नमुना-२)

प्रति,
मुख्याध्यापक,
ऑक्सफर्ड द ग्लोबल स्कुल, कौठा
ता.जि.नांदेड.

विषय :- बालाकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेलां पत्रव्यवहार/शाळेची केलेली **तपासणी दि.१८/०३/२०२६** या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा) जिल्हा परिषद, नांदेड **दिनांक-०१/०४/२०२६ पासुन दिनांक-३१/०३/२०२९** पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता पहिली ते आठवी (इंग्रजी-माध्यम) स्वंयअर्थसहाय्यीत** शाळा करिता **ऑक्सफर्ड द ग्लोबल स्कुल, कौठा ता.जि.नांदेड** शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.
वरील मान्यता ही खालील शर्तीच्या अधीन आहे.

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलगता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे, शाळा पालन करील.
३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणिखी असे की, पुर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४) परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपुर्ती मिळेल, अशी परिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५) संस्था/शाळा कोणतीही कॉम्पीटेशन फी वसुल करणार नाही अणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६) कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकरण्यात येणार नाही.
७) (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढुन टाकण्यात येणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षण किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तिन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्ण हाईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
(चार) प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.
(पाच) विकलांग/विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुर्दीनुसार समावेश करण्यात येईल.
(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास कीमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी कीमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.
(सात) अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामातं स्वत:ला गुंतवून घेऊन नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

Scanned with OKEN Scanner